सुधीर ठाकरे
सचिव

दिनांक : २६/११/२०१०.

प्रति,

मा. श्री./श्रीमती ......................................
सरपंच, ग्रामपंचायत .......................
ता. ...................., जि. ......................

महोदय/महोदया,

महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील व पुरोगामी राज्याच्या ग्रामपंचायतीमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून **निवडून आल्याबद्दल** आपले व आपल्या सर्व सहकारी पदाधिकाऱ्यांचे शासनातर्फे **मनःपूर्वक अभिनंदन.** तसेच आपणातर्फे होणाऱ्या ग्रामविकासाच्या पुढील वाटचालीस **मनःपूर्वक शुभेच्छा!**

भारतीय संविधानाने ७३ व्या घटना दुरुस्ती द्वारे पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा प्रदान केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्य तसेच पदाधिकारी म्हणुन आपल्या अधिकार व कर्तव्यात अमुलाग्र वाढ झाली. केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनाच्या अमंलबजावणीची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविली आहे. आपल्या ग्रामपंचायतीला विविध विकास योजनांतर्गत वेळोवेळी निधी मिळणार असून त्याच्या सुयोग्य विनियोगासाठी ग्रामसभेच्या माध्यमातून लोकसहभागाद्वारे ग्रामपंचायतींनी केलेल्या ग्राम विकास कृती आराखडयानुसार ग्राम विकास करणे ही ग्रामपंचायतीची मुलभूत जबाबदारी आहे.

यासाठी आपले अधिकार, कर्तव्ये यांची माहिती करुन देण्यासाठी आणि **लोकसहभागी ग्राम विकास आराखडा** व त्याला अनुसरुन इतर अनुषंगिक साधनांची सखोल माहिती व्हावी म्हणून शासनाने ग्रामपंचायतीच्या सदस्यांची क्षमता बांधणी होण्याकरिता तीन दिवसांच्या निवासी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. **सदर प्रशिक्षण हे सर्वांसाठी बंधनकारक आहे.** हे प्रशिक्षण घेतले नाही तर गावाच्या विकास कामा प्रती संबंधित सदस्य उदासीन आहेत असा समज होवून मुंबई ग्रामपंचायत कायद्यातील तरतूदीनुसार असे प्रतिनिधी अपात्र ठरु शकतात हे सुध्दा मी नम्रपणे आपले निदर्शनास आणू इच्छितो. सदर प्रशिक्षण कार्यक्रम यशवंतराव चव्हाण विकास

प्रशासन प्रबोधिनी, (यशदा), पुणे यांचे संनियंत्रणाखाली महाराष्ट्रातील सर्व पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, संयुक्त प्रशिक्षण केंद्र तसेच निवडक स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविला जाणार आहे.

राष्ट्रीय ग्राम स्वराज योजना व मागास क्षेत्र विकास निधी कार्यक्रमांतर्गत **"प्रशिक्षणातून विकास"** या विकास प्रशिक्षण अभियानाचा शुभारंभ भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिनी, दिनांक ६ डिसेंबर, २०१० रोजी महाराष्ट्राचे **आदरणीय मुख्यमंत्री, मा.ना.श्री.पृथ्वीराज चव्हाण, उप मुख्यमंत्री, मा.ना.श्री.अजित पवार, ग्राम विकास मंत्री, मा.ना.श्री.जयंत पाटील आणि ग्राम विकास राज्यमंत्री, मा.ना.श्री.सतेज पाटील** यांचे शुभहस्ते करण्याचे प्रस्तावित आहे.

आपल्या जिल्हयात/तालुक्यात आपणासाठी प्रशिक्षण कार्यक्रम पुढील कालावधीत लवकरच आयोजित करण्यात येणार आहेत. आपणासह आपल्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांसाठी प्रशिक्षणाच्या तारखा व प्रशिक्षण स्थळ आपणांस गट विकास अधिकारी/प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेकडुन कळविण्यात येईल. त्या तारखांना आपण व आपल्या पंचायतीचे सर्व सदस्य यांनी हजर राहुन आपली कर्तव्ये, शासकीय ग्राम विकास योजना यांची माहिती करुन घ्यावी व त्याचा जास्तीत जास्त उपयोग आपल्या ग्राम विकासाकरिता करुन पंचायत राज बळकटीकरणासाठी योगदान दयावे असे मी आपणांस आवाहन करतो.

**शुभेच्छांसह.**

**आपला नम्र,**

**(सुधीर ठाकरे)**
**सचिव, ग्रामविकास व पंचायत राज**